**नगरपरिषदा/नगरपंचायती सार्वत्रिक निवडणूक**
**२०१६-१७**
आचारसंहितेबाबत स्पष्टीकरण

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक - रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.३४/का.६,
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २८/११/२०१६

प्रति,
विभागीय आयुक्त (सर्व)
जिल्हाधिकारी (सर्व) (मुंबई, मुंबई उपनगर व ठाणे वगळून)

विषय :- <u>नगरपरिषदा/नगरपंचायती सार्वत्रिक निवडणुका २०१६-१७</u>
आचारसंहितेबाबत स्पष्टीकरण...
संदर्भ :- राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दि.१७/१०/२०१६ चे पत्र.

महोदय,

राज्यातील २१२ नगरपरिषदा / नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी चार टप्प्यांमध्ये दि.२७/११/२०१६, दि.११/१२/२०१६, दि.१८/१२/२०१६ व दि.०८/०१/२०१७ रोजी मतदान होणार आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या दि.१७/१०/२०१६ च्या आदेशान्वये ज्या जिल्ह्यांमध्ये चार किंवा त्यापेक्षा जास्त नगरपरिषदा / नगरपंचायतींच्या निवडणुका आहेत त्या संपूर्ण जिल्ह्यामध्ये आचारसंहिता लागू आहे.

या आचारसंहितेबाबत काही लोकांकडून विचारणा झाल्यामुळे खालीलप्रमाणे स्पष्टीकरण देण्यात येत आहे.

i) वरील चार टप्प्यातील निवडणुकांची मतमोजणी जसजशी पूर्ण होईल तसतशी संबंधित जिल्ह्याची आचारसंहिता संपुष्टात येणार आहे.

ii) दिनांक २९/११/२०१६ रोजी जरी २५ जिल्ह्यांची आदर्श आचारसंहिता संपली असली तरीही दि.१९/१२/२०१६ पर्यंत राज्यस्तरीय निर्णय, समारंभ, इ. घेता येणार नाहीत. (तिसऱ्या टप्प्यापर्यंत)

iii) दिनांक १९/१२/२०१६ रोजी टप्पा क्रमांक १, २ व ३ च्या निवडणुका संपल्यानंतर फक्त एकाच जिल्ह्यामध्ये आचारसंहिता (टप्पा क्र.४-नागपूर) लागू राहील. म्हणून दि.१९/१२/२०१६ नंतर राज्यस्तरीय निर्णय, समारंभ, इ. घेण्यास हरकत नाही. मात्र हे करताना नागपूर जिल्ह्यातील मतदारांवर विपरित परिणाम होणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(ध. मा. कानेड)
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रत :-

१. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
२. मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग-३३, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
३. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
त्यांना विनंती करण्यात येते की, जिल्हा पोलिस अधिक्षकांना आवश्यकतेनुसार पोलिस दल, जिल्हाधिकाऱ्यांना उपलब्ध करुन देण्याच्या सूचना द्याव्यात.
४. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग.
५. सचिव (२), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
६. संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई
७. पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८. प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन तथा विभागीय आयुक्त (सर्व)
९. माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
१०. संबंधित मुख्याधिकारी / प्रशासक, नगरपरिषदा /नगरपंचायती यांना उचित कार्यवाहीसाठी
११. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
१२. निवड नस्ती